# ससून रुग्णालयाचा पथदर्शी प्रकल्प

## गिरीश महाजन : नवजात शिशू अतिदक्षता विभागाचे उद्घाटन

पुणे : औद्योगिक कंपन्या व स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून ससून रुग्णालयात उभारण्यात आलेला नवजात शिशू अतिदक्षता विभाग (एनआयसीयू) प्रकल्प राज्यातील इतर सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी पथदर्शी आहे. राज्यातील इतर वैद्यकीय महाविद्यालयांमध्येसुद्धा असे प्रकल्प राबविण्याची आवश्यकता असून यासंदर्भात सूचना सर्व वैद्यकीय महाविद्यालयांच्या अधिष्ठात्यांना दिल्या जातील, असे राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी रविवारी सांगितले.

ससून रुग्णालयात फिनोलेक्स प्रायव्हेट लिमिटेड व त्याच्याशी संलग्न मुकुल माधव फाउंडेशन, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, कमिन्स इंडिया, सुझलॉन एनर्जी, सिसका एल. ई. डी. या कंपन्यांनी दिलेल्या अकरा कोटी रुपयांच्या निधीतून ५९ खाटांचा 'एनआयसीयू' कक्ष उभा करण्यात आला आहे. या



ससूनमधील एनआयसीयू कक्षाच्या लोकार्पणानंतर पाहणी करताना खासदार अनिल शिरोळे, पालकमंत्री गिरीश बापट, महापौर मुक्ता टिळक, वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे आदी.

विभागाच्या लोकार्पण सोहळ्याच्या कार्यक्रमात महाजन बोलत होते. कार्यक्रमास महापौर मुक्ता टिळक, खासदार अनिल शिरोळे, पालकमंत्री गिरीश बापट, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे, मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालक रितू छाब्रिया, फिनोलेक्स उद्योगाचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय तावरे आदी उपस्थित होते.

महाजन म्हणाले, ''उद्योगांची सीएसआरच्या माध्यमातून शिक्षणाबरोबरच आरोग्यक्षेत्रासाठीही निधी देण्याचा विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे समाजातील सामान्य रुग्णांना सरकारी रुग्णालयात अद्ययावत वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील.''

बापट म्हणाले, ''ससून रुग्णालयातील डॉक्टर गरीब रुग्ण केंद्रबिंदू मानून रुग्णसेवा देत आहेत. ससून पॅटर्न राज्यात सर्वत्र वापरण्याची आवश्यकता आहे.''

कार्यक्रमात अनिल शिरोळे, दिलीप कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. मध्यमवर्गीयांसाठी ससून रुग्णालयातील सेवा सक्षम करण्यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला होता, असे चंदनवाले यांनी सांगितले.

महेश सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले.

(प्रतिनिधी)